पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ३

सभावृत्तांत

दिनांक:- १३/०५/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा."फ" प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १३/०३/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता "फ" क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सभापती |
| २. | मा. सायकर अजय शंकरराव | सदस्य |
| ३ | मा. जाधव साधना रामदास | सदस्य |
| ४. | मा.जाधव राहुल गुलाब | सदस्य |
| ५. | मा.पवार संगीता शाम | सदस्य |
| ६. | मा.बो-हाडे शुभांगी संजय | सदस्य |
| ७. | मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित | सदस्य |
| ८. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| ९. | मा.भालेकर पंकज दत्तात्रय | सदस्य |
| १०. | मा.पवार जितेंद्र हनुमंत | सदस्य |
| ११. | मा.भालेकर प्रविण महादेव | सदस्य |

याशिवाय श्री. दिलीप गावडे (क्षेत्रीय अधिकारी), श्री. सतिश इंगळे . (कार्यकारी अभियंता स्थापत्य), श्रीमती. प्रभावती गाडेकर, प्र. प्रशासन अधिकारी तथा सभा सचिव, श्री. घोडे पी.ए. (कार्यकारी अभियंता विद्युत) श्री.पिरजादे लियाकत (कार्य. अभियंता पाणीपुरवठा), श्री. श्रीकांत सवणे (कार्यकारी अभियंता, बीआरटीएस), श्री. प्रदीप पुजारी (प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू), श्री. कदम पी.जे.(लेखाधिकारी), श्री. शिर्के डी.जे. (सहा. आरोग्याधिकारी), श्री. सुनिल नरोटे (उपअभियंता स्था), श्री. किशोर महाजन ( उपअभियंता पाणीपुरवठा), श्री. विजय जाधव (उपअभियंता स्थापत्य -उदयान) श्री. बंडवल ई.एच. हार्टी सुपरवायझर, श्री. अतुल जोशी अतुल (कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.हनुमंत शिंदे ( उपअभियंता जलनि:सारण), श्री.कुलकर्णी एस.एस. (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक, श्री.सुभाष पवार (क्रिडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

**श्री. श्रीकांत सवणे (कार्यकारी अभियंता बीआरटीएस) यांनी पिंपरी चिंचवड शहरातील पार्कींग पॉलीसीचे सादरीकरण करुन याबाबत सन्मा. सदस्यांच्या सूचना असल्यास कळविणेबाबत आवाहन केले.**

**सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष मा. सौ. मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.**

से.नं. १७ व १९ स्पाईन रोड प्राधिकरण चिखली घरकुलमधील चौकास वेगवेगळी नावे दिली असुन झेंडे लावणेस सुरुवात केली आहे. सदरचे अतिक्रमण मनपा मार्फत काढुन घेवुन घरकुलमधील चौक, गार्डन रस्ता व गेटला मनपाच्या वतीने नावे दयावीत अशी तक्रार श्री. संभाजी गोरे यांनी मा. आयुक्त सो. यांजकडे केली आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी मा. प्रभाग समितीमध्ये सदर विषय घेवुन प्रभागाच्या मान्यतेने नावं देणेबाबत मा. आयुक्त सो यांनी सूचित केले आहे. असे सभा सचिव सौ. प्रभावती गाडेकर यांनी सांगितले.

तक्रारीच्या अनुषंगाने अतिक्रमण निरीक्षक यांचेमार्फत स्थळपाहणी करुन अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर ठिकाणी वेगवेगळया नावाने लावणेत आलेले फलक अतिक्रमण पथकामार्फत तात्काळ हटविणेत यावेत. नामकरणाबाबतचा निर्णय पुढील सभेचे वेळी घेणेत येईल असे सर्वानुमते सांगितले.

अ. कार्यपत्रिका क्रमांक १ दिनांक ०६/०४/२०१६ रोजी झालेचा सभावृत्तांत कायम करणेत असल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

ब. कार्यपत्रिका क्रमांक २ दिनांक २८/०४/२०१६ रोजी झालेचा सभावृत्तांत कायम करणेत असल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**विषय क्र. १** चिखली मधील रिव्हर रेसिडेन्सी चौकाला "**कै. नामदेव दगडू साने चौक** "असे नामकरण करणेबाबत..
मा. स्वाती साने व मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

**मा. सभापती यांचे संमतीने खालील प्रमाणे विषय ऐनवेळी सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र. २** प्रभाग क्र. ४ मध्ये सी.डी. प्लॉट नं. २ पुर्णानगर येथील उदयानास "**श्री. कैकाडी महाराज उदयान चिखली"** असे नामकरण करणेबाबत ....
मा. अजय सायकर व मा. राहुल जाधव यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ३** प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण या भागातील विविध चौकांस/पूलास/वाचनालयास/पा यास पुढीलप्रमाणे नामकरण करणेबाबत.

१. माता अमृतानंदमयी मठ ते निगडी गावठाणकडे जाणारा रस्ता व यमुनानगरकडे जाणार रस्ता या मधील चौकास "**भोलाई - देवी आई चौक"** असे नामकरण करणे.

२. मगर गिफट हाउस कडून रॉयल वाईन्सकडे जाणारा रस्ता या रस्त्यास "**कै. भाऊसाहेब पांडूरंग तापकिर मार्ग"** असे नामकरण करणे.

३. साईनाथ नगर कडून लक्ष्मी नगर निगडी गावठाणकडे जाणारा रस्ता या रस्त्यास "**कै. बाबुराव गणपत काळभोर (पोलिस पाटील)मार्ग"** असे नामकरण करणे.

४. साईनाथ नगर मधून श्रीकृष्ण मंदिराकडे जाणारा जो नव्याने पादचारी पूल बनविण्यात आला आहे त्या पूलास "**कै. अरुण रामदास भागवत**" असे नामकरण करणे.

५. साईबाबा मंदिर, यमुनानगर या ठिकाणी नव्याने वाचनालय उभारण्यात आले आहे त्यास "**ओम साईराम प्रेम मंदिर**" असे नामकरण करणे.

६. निगडी गावठाण मारुती मंदिराच्या समोर जो पूर्वीपासून पार आहे या ठिकाणी पारास/चौकास "**कै. कोंडीबा हरि काळभोर गावबाबा चौक** "असे नामकरण करणे.

७. माता अमृतानंदमयी मठ ते रुणाल फ्लोरेन्स कडे जाणारा जो रस्ता आहे या रस्त्यास "**मनोज हनुमंत पवार**"असे नामकरण करणे.

मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा. शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र. ४** प्रभाग क्र. ४ शरदनगर गल्ली क्रमांक ७ येथे "**कै. आत्माराम केशवराव शिंदे (माजी सैनिक) मार्ग** " असे नामकरण करणेबाबत..

मा. मंदाकिनी ठाकरे व मा. अजय सायकर यांचा प्रस्ताव.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय संदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेणेत आले.**

ठराव क्र. ३ विषय क्र. १

दि. १३/०५/२०१६ विभाग –

सुचक:- मा. स्वाती साने अनुमोदक:- मा. मंदाकिनी ठाकरे

संदर्भ:- मा. स्वाती साने व मा. मंदाकिनी ठाकरे यांचा दि. ८/१/२०१६ चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली मधील रिव्हर रेसिडेन्सी चौकाला "**कै. नामदेव दगडू साने चौक**" असे नामकरण करणेबाबतचा विचार करणे.

सदर ठराव दप्तरी दाखल करणेत यावा .

सदर ठराव सर्वानुमते झाला.

----

ठराव क्र. ४ विषय क्र. २

दि. १३/०५/२०१६ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक:- मा. अजय सायकर अनुमोदक:- मा. राहुल गुलाब

संदर्भ:- मा. अजय सायकर व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि. १२/५/२०१६ चा प्रस्ताव

विषय - प्रभाग क्र. ४ मध्ये सी.डी. प्लॉट नं. २ पुर्णानगर येथील उदयानास "**श्री. कैकाडी महाराज उदयान चिखली**" असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ५ विषय क्र. ३
दि. १३/०५/२०१६ विभाग – स्थापत्य विभाग
सुचक:- मा. अश्विनी मराठे (चिखले) अनुमोदक:- मा. शुभांगी बो-हाडे
संदर्भ:- मा. अश्विनी मराठे (चिखले) व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि. १३/५/२०१६ चा प्रस्ताव.
विषय - प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण या भागातील विविध चौकांस/पूलास/वाचनालयास/ पारास खालीलप्रमाणे नामकरण करणे.

१. माता अमृतानंदमयी मठ ते निगडी गावठाणकडे जाणारा रस्ता व यमुनानगरकडे जाणार रस्ता या मधील चौकास "**भोलाई - देवी आई चौक**" असे नामकरण करणे.

२. मगर गिफट हाउस कडून रॉयल वाईन्सकडे जाणारा रस्ता या रस्त्यास "**कै. भाऊसाहेब पांडूरंग तापकिर मार्ग**" असे नामकरण करणे.

३. साईनाथ नगर कडून लक्ष्मी नगर निगडी गावठाणकडे जाणारा रस्ता या रस्त्यास "**कै. बाबुराव गणपत काळभोर (पोलिस पाटील)मार्ग**" असे नामकरण करणे.

४. साईनाथ नगर मधून श्रीकृष्ण मंदिराकडे जाणारा जो नव्याने पादचारी पूल बनविण्यात आला आहे त्या पूलास "**कै. अरुण रामदास भागवत**" असे नामकरण करणे.

५. साईबाबा मंदिर, यमुनानगर या ठिकाणी नव्याने वाचनालय उभारण्यात आले आहे त्यास "**ओम साईराम प्रेम मंदिर**" असे नामकरण करणे.

६. निगडी गावठाण मारुती मंदिराच्या समोर जो पूर्वीपासून पार आहे या ठिकाणी पारास/चौकास "**कै. कोंडीबा हरि काळभोर गावबाबा चौक**" असे नामकरण करणे.

७. माता अमृतानंदमयी मठ ते रुणाल फ्लोरेन्स कडे जाणारा जो रस्ता आहे या रस्त्यास "**मनोज हनुमंत पवार**" असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. ६ विषय क्र. ४
दि. १३/०५/२०१६ विभाग – स्थापत्य विभाग
सुचक:- मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक:- मा. अजय सायकर
संदर्भ:- मा. मंदाकिनी ठाकरे व मा. अजय सायकर यांचा दि. १३/५/२०१६ चा प्रस्ताव
विषय - प्रभाग क्र. ४ शरदनगर गल्ली क्रमांक ७ येथे "**कै. आत्माराम केशवराव शिंदे (माजी सैनिक) मार्ग**" असे नामकरण करणेत यावे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत २०१३-२०१४ मध्ये घेण्यात आलेल्या प्रशासकीय सुधारणा व गतिमानता अभियान अंतर्गत १० कलमी कार्यक्रमात पाणीपुरवठा विभागास एस २ पाणीवितरण व्यवस्था (महापालिका स्तर- प्रथम क्रमांक), एस २ पाणीवितरण व्यवस्था (प्रभाग स्तर- तृतीय क्रमांक), अजमेरा टॉवर पाणीवितरण व्यवस्था (महापालिका स्तर- द्वितीय क्रमांक),

अजमेरा टॉवर्स (प्रभाग स्तर- प्रथम क्रमांक) तसेच आरोग्य विभागास यमुनानगर ११ (प्रभाग स्तर- प्रथम क्रमांक), निगडी हिंदु स्मशान भुमी (प्रभाग स्तर- प्रथम क्रमांक), निगडी मुस्लीम स्मशान भुमी (प्रभाग स्तर- द्वितीय क्रमांक), निगडी हिंदू स्मशानभूमी (महापालिका स्तर-तृतीय क्रमांक) पारितोषीक मिळाल्याबाबत सर्व सन्मा. सदस्य/ अधिकारी यांनी पाणीपुरवठा व आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

**सभा सचिव प्रशासन अधिकारी श्रीमती गाडेकर यांनी सर्व सन्मा. नगरसदस्यांना क्षेत्रसभा आयोजीत करणेकामी पत्र, स्मरणपत्र देण्यात आलेले असुन त्वरीत क्षेत्रसभा आयोजनाकामी निश्चित वेळ, ठिकाण व दिनांक देणेबाबत आवाहन केले.**

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सौ. मंदाकिनी अर्जुन ठाकरे)
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक:- फक्षेका/सभा/कावि/ १६५ /२०१६
दिनांक:- १७/०५/२०१६

सही/-
(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय